N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन लाखनी जि. भंडारा

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** लाखनी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0176 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/05/2025 17:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 23/04/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/04/2025
   **Time From (वेळेपासून):** 11:47 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/05/2025 **Time (वेळ):** 12:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 035

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/05/2025 17:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** डोंरवार पेट्रोलपंप लाखनी ,लाखनी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

<u>फिर्याद</u>

पोलीस स्टेशन, लाखनी
दिनांक : १४/०५/२०२५

नावः- नरहरी नामदेव मेश्राम,वय ९२ वर्षे, रा.वार्ड नंबर २, बौद्ध विहार, पचखेडी( गांडली) ता. कुही, जिल्हा- नागपूर, व्यवसाय :- शेती, मोबाईल क्रमांक ८६०५९८०९५९१

मी दिनांक २२/०४/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे जावून श्री.लोहार सर, पोलीस उपअधीक्षक यांचेकडे गैरअर्जदार श्री.राजेश भजने, पोलीस हवालदार, पोलीस स्टेशन, लाखनी यांनी मी दिलेल्या तक्रारीवर कार्यवाही करुन माझे मुरमाडी येथील खरेदी केले घर खाली करुन घराचा ताबा मला देणे करीता प्रथम ५,०००/-रुपये आणि घराचा ताबा मिळाल्यानंतर १५,०००/-रुपये असे एकुण २०,०००/-रुपयाचे लाचेची मागणी केल्या प्रकरणी तक्रार दिली होती. मी दिलेली तक्रार खालील प्रमाणे.

**तक्रार,** भंडारा, दिनांक २२/०४/२०२५, **प्रति,** मा. पोलीस उप- अधीक्षक साहेब, ॲन्टी करप्शन ब्युरो विभाग, भंडारा. **विषय** लाच मागणी करणारे पोलीस कर्मचारी यांचेवर कायदेशिर कार्यवाही होणे बाबत. **अर्जदार,** नरहरी नामदेव मेश्राम, वय ९२ वर्षे, रा.वार्ड नंबर २, बौद्ध विहार, पचखेडी( गांडली) ता.कुही, जिल्हा- नागपूर, मोबाईल क्रमांक ८६०५९८०९५९१

**गैरअर्जदार** :- पोलीस हवालदार, श्री. राजेश भजने, नेमणुक, पोलीस स्टेशन, लाखनी, जिल्हा भंडारा.

**महोदय,** मी तक्रारदार वरील प्रमाणे असुन तक्रार देतो की, मुरमाडी/ सावरी तालुका,लाखनी येथील श्रीमती नंदा दुर्वास रामटेके, यांचे नावाचे घर मी खरेदी केले असुन त्याची रजिस्ट्री रजिस्टार कार्यालय लाखनी येथुन केली आहे. त्या घरा मध्ये घरमालक नंदा दुर्वास रामटेके हे राहत असल्याने मी त्यांना रजिस्ट्री झाल्यानंतर घर खाली करण्यास सांगितले असता श्रीमती नंदा दुर्वास रामटेके यांनी सन २०२४ मध्ये घर खाली केले होते. त्यांनी घर खाली केल्यानंतर मी माझे घराला लॉक लावून घरामध्ये किरायेदार ठेवणे करीता शोध घेत होतो.

दिनांक १७/०४/२०२५ रोजी मला माझा मित्र श्री दिपक जनबंधु, रा. लाखनी याने फोन करून माझे वरील घराचे कुलुप तोडून श्रीमती नंदा दुर्वास रामटेके व तिचा मुलगा नामे कमलकिशोर दुर्वास रामटेके हे माझे घरामध्ये घुसले असल्याचे सांगितले. म्हणून मी त्या रात्रीच पोलीसांना ११२ वर कॉल केला व श्रीमती नंदा दुर्वास रामटेके ही माझे घराचे कुलुप तोडून आत शिरल्याची तक्रार केली होती.

मी दिनांक १८/०४/२०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजता पोलीस स्टेशन, लाखनी येथे माझा मित्र श्री. गुलाब संतोष चांदेकर यांचे सोबत गेलो. व श्रीमती नंदा दुर्वास रामटेके हीचे विरुध्द तक्रार नोंदवली असता मला पोलीस स्टेशन, लाखनी यांचे कडुन माझे तक्रारीवर एन.सी. क्र. २०५/२०२५ कलम ३५२, ३५१(२) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. त्यानंतर लाखनी पोलीस स्टेशनचे कर्मचारी व मी असे सर्वजण माझे वरील घरी भेट दिली. त्यावेळी पोलीसांनी श्रीमती नंदा दुर्वास रामटेके हिला व तिच्या मुलास घर खाली करण्यास सांगितले. परंतु त्यांनी घर खाली करण्यास नकार दिला. त्यांनतर मी तसेच पोलीस व श्रीमती नंदा दुर्वास रामटेके असे पोलीस स्टेशन, लाखनी येथे आलो. तिथे परत पोलीसांनी श्रीमती नंदा दुर्वास रामटेके हिला समजावीले.परंतु तिथे सुध्दा त्यांनी घर खाली करण्यास नकार दिला.

त्यांनतर लाखनी पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार श्री भजने यांनी श्रीमती नंदा दुर्वास रामटेके हिला बोलावून तिच्या सोबत बोलणी केली आणि ती बाहेर आल्यावर त्यांनी मला बोलावीले असता मी माझा मित्र श्री. गुलाब संतोष चांदेकर यांचे सोबत गैरअर्जदार श्री. भजने पोलीस हवालदार यांचे कडे गेलो. तेव्हा श्री. भजने यानी मला ''मी तुझा घर खाली करुन घराचा ताबा तुला मिळवून देतो. परंतु तुला त्या करीता मला २०,०००/-रुपये दयावे लागतील असे बोलले'' तेव्हा मी त्यांना माझे जवळ सद्या एवढे पैसे नाहीत असे सांगितले. तेव्हा गैरअर्जदार श्री. भजने यांनी मला तु सद्या ५,०००/-रुपये दे बाकीचे १५,०००/-रुपये घराचा ताबा मिळाल्यावर दिले तरी चालेले असे बोलला. तेव्हा मी त्याला माझे जवळ सद्या १,०००/-रुपये आहेत असे बोललो. तेव्हा गैरअर्जदार

(डॉ. अरूणकुमार लोहार)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा

नरहरी मेश्राम
१४-५-२०२५

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नरहरी नामदेव मेश्राम

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वार्ड नंबर 2, बौद्ध विहार, पचख,कुही ,कुही,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वार्ड नंबर 2, पचखेडी,कुही ,कुही,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8605809591

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेश निलकंठराव भजने | | | 1. समर्थ नगर मुरमाडी/लाखनी , लाखनी ,लाखनी,भंडारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | एक विवो कंपनिचा मोबाईल अँन्ड्राइड मोबाईल फोन | 10,000.00 |

पोलीस हवालदार भजने यांनी मला ५,०००/-रुपये पेक्षा कमी घेणार नाही. अगोदर ५,०००/-रुपये दया बाकीचे १५,०००/-रुपये रुमचा ताबा मिळाल्यावर दयावे लागतील असे बोलले.

गैरअर्जदार पोलीस हवालदार श्री. भजने, नेमणूक पोलीस स्टेशन, लाखनी यांनी मी पोलीस स्टेशन, लाखनी येथे दिलेल्या तक्रारीवरुन माझे मुरमाडी येथील घरामध्ये राहत असलेली श्रीमती नंदा दुर्वास रामटेके व तिच्या मुलास बाहेर काढून घराचा ताबा मला देणेकरीता स्वःता करीता २०,०००/-रुपयाची मागणी करुन प्रथम ५,०००/-रुपये व घर खाली करुन ताबा दिल्यानंतर १५,०००/-रुपये असे एकुण २०,०००/-रुपयाचे लाचेची मागणी केल्याने आणि गैरअर्जदार हे त्यांचे स्वतः करीता लाच रक्कमेची मागणी करीत असल्याने आणि मला त्यांना लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने दिनांक २२/०४/२०२५ रोजी गैरअर्जदार पोलीस हवालदार श्री. भजने, नेमणूक पोलीस स्टेशन, लाखनी, जिल्हा- भंडारा यांचेवर कायदेशिर कार्यवाही होणेस तक्रार देत आहे.

मी दिलेल्या तक्रारीवर श्री. लोहार सर पोलीस उपअधीक्षक, लाचलचपुत प्रतिबंधक विभाग, भंडारा यांनी दोन शासकीय पंच बोलावुन मला तसेच दोन्ही पंचांना लाचेच्या मागणी संबंधाने करण्यात येणारे कार्यवाही संबंधाने तसेच त्यांचे कार्यालयातील''सोनी''कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर, नवीन सॅनडीस्क कंपनीचे ३२ जीबीचे मेमरी कार्ड दाखवून त्याचा कार्यवाही मध्ये कशा प्रकारे उपयोग केला जातो, याबाबत सविस्तर माहिती दिली.

त्यांनतर पडताळणी कार्यवाही करीता मी आणि माझा मित्र असे माझे मोटार सायकलने तसेच श्री. लोहार सर, त्यांचा स्टाफ दोन्ही पंच खाजगी चार चाकी गाडीने गडेगाव परिसरातील सेवक वाघाये यांचे बासमती राईसमिल परिसरात गेलो. तिथे श्री. लोहार सर यांनी मला तसेच पंच श्री. आवेश खान याला गैरअर्जदार यांनी मला लाचेची मागणी केली किंवा कसे? हे पडताळणी करणे संबंधाने सुचना दिल्या.

त्यांनतर व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन त्यात नविन मेमरी कार्ड घालून पंच श्री. आवेश खान यांचे आवाजात रेकॉर्डीग मोडवर सुरु करुन तो माझे गळयात लटकविला. मी आणि पंच आवेश खान, माझे जवळील मोपेड गाडीने पोलीस स्टेशन, लाखनी येथे गेलो. तिथे जावुन गैरअर्जदार श्री. भजने यांचे बाबत विचारणा केली असता श्री. भजने हे साप्ताहीक रजेवर असल्याची माहिती मिळाल्याने आम्ही श्री. लोहार सर यांचे कडे परत गेलो. माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर पंच ओवश खान यांचे आवाजात बंद करण्यात आले. गैरअर्जदार हे हजर मिळुन आले नसल्याने पुढील कार्यवाही ही दिनांक २३/०४/२०२५ रोजी करण्याचे ठरविण्यात आले होते.

दिनांक २३/०४/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता मी आणि माझा मित्र गुलाब चांदेकर, याचे सोबत गडेगाव परिसरात सेवक वाघाये यांचे बासमती राईस मिलाजवळ पोहचलो. थोडयाच वेळात श्री. लोहार सर हे त्यांचा स्टाफ आणि दोन्ही पंचांसोबत आमचे जवळ आले. तिथुन आम्ही के.के.लॉन जवळील नाल्याजवळ गेलो. तिथे मला तसेच पंच कु. संगिता वंजारी यांना श्री. लोहार सर यांनी पडताळणी कार्यवाही संबंधाने सुचना दिल्या. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन त्यात दिनांक २२/०४/२०२५ रोजी वापरण्यात आलेले मेमरी कार्ड घालून व्हॉईस रेकॉर्डर पंच कु.संगिता वंजारी यांचे आवाजात रेकॉर्डीग मोडवर सुरु करण्यात आले. मी आणि पंच कु. संगिता वंजारी असे माझे जवळी मोपेड गाडीने पोलीस स्टेशन, लाखनी येथे गेलो. तिथे गैरअर्जदार भजने यांचे बाबत विचारपुस केली असता ते हजर नसल्याचे माहीत मिळाली. मी माझे मोबाईल फोनवरुन गैरअर्जदार भजने यांना फोन केला आणि पोलीस स्टेशनला आलो असल्याचे सांगितले. तेव्हा गैरअर्जदार यांनी ते सुट्टीवर असल्याचे व भंडारा येथे जात असल्याचे सांगून अर्धा पाऊन तासात फोन करतो असे सांगितल्याने आम्ही तिथुन परत लोहार सर यांचे कडे गेलो. व्हॉईस रेकॉर्डर माझे गळयातुन काढुन पंच कु. संगिता वजारी यांचे आवाजात बंद करण्यात आले. श्री. लोहार सर यांनी सुध्दा व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. आम्ही तिथुन दुर अंतारवर जावुन वेगवेगळे थांबलो. काही वेळा नंतर गैरअर्जदार श्री. भजने यांनी मला फोन केला व त्यांनी मला डोंगरवार पेट्रोल पंपवर भेटण्यास सांगितले असल्याने मी श्री. लोहार सर यांना त्याबाबत फोनवर माहीती दिली व त्यांचे जवळ गेलो.

त्यांनतर श्री. लोहार सर, यांनी परत पडताळणी कार्यवाही संबंधाने आम्हाला सुचना दिल्या. व्हॉईस रेकॉर्डर पंच कु. वंजारी यांचे आवाजात रेकॉर्डीग मोडवर सुरु करण्यात आले. मी आणि पंच कु. वंजारी असे माझे जवळ

(डॉ. अरुणकुमार लोहार)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | इतर | संकीर्ण/विविध | एक 32 जी.बी. क्षमतेची सनडीस्क कंपनीची मेमरी कार्ड | 0.00 |
| 3 | इतर | संकीर्ण/विविध | एक 32 जी.बी. क्षमतेची सनडीस्क कंपनीची एक मेमरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन, लाखनी येथे दिनांक 18/04/2025 रोजी त्यांचे मौजा मुरमाडी येथे असलेले घरा मध्ये राहणारे लोकांना घर खाली करुन देणे बाबत दिलेल्या तक्रारीवर कार्यवाही करणे, घर खाली करुन त्याचा ताबा फिर्यादीस देणे करीता यातील आरोपी लोकसेवक यांनी फिर्यादीस प्रथम 5,000/-रुपये आणि घराचा ताबा मिळाल्यानंतर 15,000/-रुपये असे एकुण 20,000/-रुपयाचे लाचेची मागणी केल्याचे तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारीवर पडताळणी कार्यवाही करण्यात आली असता पडताळणी कार्यवाही दिनांक 23/04/2025 रोजी यातील आरोपी लोकसेवक यांनी फिर्यादीस घराचा ताबा मिळवून देणे करीता स्वतःचे आर्थीक फायदयासाठी पडताळणी कार्यवाही वेळीच फिर्यादीस गैरफायदयाचे स्वरुपात पाच हजार रुपयाची लाचेची मागणी करुन पडताळणी कार्यवाही वेळीच फिर्यादी कडुन 1,000/- रुपये स्विकारुन बाकीचे 4,000/-रुपये दिनांक 27/04/2025 रोजी स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निश्पन्न झाल्याने आणि सापळा कार्यवाही दरम्यान यातील आरोपी लोकसेवक यांना फिर्यादी यांचेवर कार्यवाही संबंधाने संशय आल्याने फिर्यादी यांचे कडुन लाच रक्कम स्विकारली नसल्याने आरोपी लोकसेवक यांनी फिर्यादी यांना लाच रक्कम मागणी केल्याचे आणि ती स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे तक्रारदार यांचे तक्रारीवरुन सदरचा गुन्हा नोंद.

--------------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------------

मोपेड गाडीने डोंगरवार इंडीयन आईल पेट्रोलपंप जवळ गेलो. तिथुन गैरअर्जदार यांना फोन लावला व पोलीस स्टेशन लाखनीचे पुढे काही अंतरावर गेलो. तिथे परत मी गैरअर्जदार याला फोन केला.गैरअर्जदार श्री.राजेश भजने यांनी परत मला पेट्रोलपंपवर येण्यास सांगितल्याने आम्ही परत पेट्रोलपंप जवळील झाडा जवळ जावुन थांबलो. गैरअर्जदार राजेश भजने यांनी मला फोन केला व आमचे जवळ आले. मी त्यांचे सोबत नमस्कार घेतला. व पंच कु. संगिता वंजारी ही मावस बहिण असल्याचे सांगितले. तिथुन मी आणि गैरअर्जदार, गैरअर्जदार यांचे मोटार सायकलने पेट्रोलपंपचे पाठीमागे असलेल्या बार कडे झाडा खाली गेलो. मी गैरअर्जदार श्री. राजेश भजने यांना माझे ''तक्रारीचा तपास त्यांचे कडेच आहे का'' असे विचारले तेव्हा श्री. राजेश भजने यांनी ''सद्या तपास त्यांचे कडे आहे. परंतु तपास दुसऱ्या कडे जावू शकतो. नंतर आपण ठाणेदार यांना साधवला तर विषय नंतर होवू शकते'' असे सांगितले. मी गैरअर्जदार श्री. राजेश भजने यांना काही कमी करा असे बोललो असता श्री. भजने यांनी मला उजव्या हाताचे चार बोट हलवून दाखवीले. मी त्यांना मला बोट समजत नाही असे बोलून काही तरी बोला असे बोललो. तेव्हा गैरअर्जदार यांनी मला ''मी कोऑपरेट करीन तुला नाही असा नाही'' असे बोलून ''आता पाच हजार रुपये देवून दे'' असे बोलले. मी त्यांना ''पाच हजार रुपये उद्या आनून देतो'' असे बोललो असता त्यांनी विश्वास नाही असे सागितल्याने मी त्यांना विश्वास बसावा म्हणुन माझे जवळचे १,०००/- रुपये दिले असता त्यांनी ते माझे जवळुन घेवून बाकीचे ४,०००/-रुपये दिनांक २७/०४/२०२५ रोजी घेवून येण्यास सांगितले. त्यांनतर मी आणि पंच कु. वंजारी असे मिळुन श्री. लोहार सर यांचे कडे गेलो. माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर पंच कु. वंजारी यांचे आवाजात बंद करण्यात आले. श्री.लोहर सर यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये झालेले संभाषण ऐकले. त्यांनतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा कार्यालयात आलो. श्री. लोहार सर यांनी मला गैरअर्जदार यांची लाचेची मागणी स्पष्ट झाली असल्याचे सांगून गैरअर्जदार यास लाच रक्कम देणे करीता ४,०००/- रुपये सादर करण्यास सांगितले. मी त्यांना माझे जवळ असलेल्या घर खर्चाचे रक्कमे मधुन ४,०००/- रुपये ज्यात ५००/-रुपयाचे ०८ नोटा दिले. त्यांनी ते मोजुन घेवून त्यांचे नंबर लॅपटॅपवर टाईप केले आणि दोन्ही पंचांकडुन नबंरची आणि टाईप केलेले क्रमांकाची खात्री केली. त्यांनतर श्री.लोहार सर यांनी मला तसेच दोन्ही पंचांना नोटांवर लावण्यात येणारे ॲन्थ्रासिन पावडर आणि अल्ट्रॉवायलेट टार्च संबंधाने माहिती देवून प्रात्यक्षिक करुन दाखवून त्या नोटा लिफाप्यात ठेवले. पुढील कार्यवाही ही दिनांक २७/०२/२०२५ रोजी करण्याचे ठरविण्यात आले होते.

दिनांक २७/०४/२०२५ रोजी मी सकाळी सवेक वाघाये यांचे बासमती राईस मिल जवळील हनुमान मंदीरा जवळ गेलो. तिथे श्री लोहार सर हे कार्यवाहीतील सदस्या सह खाजगी चारचाकी तसेच मोटार सायकलने आले. श्री. लोहार सरांनी माझी पंच श्री.आवेश खान यांचे हस्ते अंगझडती घेतली व माझे शर्टचे समोरील डावे बाजुचे खिशात लिफाप्यातील पावडर लावलेल्या नोटा ठेवल्या. सापळा कार्यवाहीतील सर्व सदस्यांना कार्यवाही संबंधाने सुचना दिल्या. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन त्यात नवीन मेमरी कार्ड घातला व पंच श्री. आवेश खान यांचे आवाजात रेकॉर्डीग मोडवर सुरु केले. मी पंच श्री. आवेश खान यांचे सोबत माझे जवळील मोपेड गाडीने पोलीस स्टेशन, लाखनी येथे गेलो. मी पोलीस स्टेशन मध्ये गैरअर्जदार श्री. राजेश भजने यांचे बाबत विचारणा केली ते सुट्टीवर असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे मी श्री. राजेश भजने यांचे मोबाईल फोनवर मोबाईल फोन स्पिकरवर ठेवून बोलणी केली असता गैरअर्जदार यांनी फोन रिसीव्ह केला. त्यांनी ते सुट्टीवर असल्याचे सांगितले. मी त्यांना भेटण्या बाबत बोललो असता त्यांनी एक तासाने फोन करतो असे सांगितले. त्यामुळे आम्ही परत सेवक वाघाये यांचे बासमती राईस मिल जवळील हनुमान मंदीराजवळ गेलो. माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढून पंच आवेश खान यांचे आवाजात बंद करण्यात आले.

त्यांनतर एक तास होवून सुध्दा गैरअर्जदार श्री. राजेश भजने यांचा फोन आला नसल्याने पंच आवेश खान याचे आवाजात व्हॉईस रेकॉर्डर सुरु करण्यात आला. मी माझे मोबाईल क्र. ८६०५८०९५९१ वरुन गैरअर्जदार श्री. राजेश भजने यांचे मोबाईल क्र. ९७६४००११८० वर दोनदा कॉल करुन फोन स्पिकरवर ठेवला परंतु गैरअर्जदार यांनी कॉल रिसीव्ह केला नाही. त्यांनतर थोडयावेळाने पंच आवेश खान याचे आवाजात व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात

(डॉ. अरूणकुमार लोहार)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
SUNIL PANDURANG SONAWANE
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PBMAH64927
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
नरहरी मेश्राम

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Hridaynarayan Saty
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN61353

आले. थोडयाच वेळात गैरअर्जदार श्री.राजेश भजने यांनी मला फोन केला व कुमार पेट्रोलपंप लाखनी जवळ भेटण्यास बोलावील्याने मी त्याबाबत श्री.लोहार सर यांना माहिती दिली. त्यांनतर परत पंच आवेश खान याचे आवजात व्हॉईस रेकॉर्डर रेकॉर्डीग मोडवर सुरु करण्यात आले. मी पंच आवेश खान यांचे सह माझे मोपेड गाडीने कुमार पेट्रोलपंप लाखनी जवळ गेलो. तिथुन गैरअर्जदार श्री. भजने यांना फोन केला असता त्यांनी मला कुमार पेट्रोलपंप जवळील पुलाचे खाली बोलावीले. मी तिथे जावुन थांबलो असता लगेच गैरअर्जदार हे त्यांचे मोटार सायकलने आमचे जवळ आले. मी त्याचे सोबत माझी तक्रार व कामा संबंधाने बोलणी केली असता गैरअर्जदार यांनी माझी तक्रार श्री. आत्राम यांचे कडे तपासा करीत गेली आहे असे सांगितले. मी त्यांना त्यांनी सांगितले प्रमाणे काम केला आहे असे सांगितले तेव्हा गैरअर्जदार यांनी मला ''मी जोपर्यंत काम होत नाही, समोरच्याचा समाधान होत नाही तोपर्यंत मी घेणार नाही आणि मी एकवेळ काम हाती घेतलो तो सोडत नाही मग'' अशा प्रकारे बोलणी करुन ते स्वत: चार पाच दिवस सुट्ट्यांवर आहे. सुट्टयावरुन आल्यावर ते आत्राम सोबत बोलून कळवतो असल्याचे सांगुन माझे जवळुन पैसे घेतले नाही व माझे जवळुन निघून गेले. त्यामुळे आम्ही सुध्दा तिथुन सेवक वाघाये यांचे बासमती राईस मिल जवळील हनुमान मंरिजवळ गेलो. माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढून पंच आवेश खान यांचे आवाजात बंद करण्यात आले. माझे शर्टचे खिशातुन पावडर लावलेल्या नोटा आवेश खान यांचे हस्ते काढून लिफाप्यात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मी श्री. लोहार सर यांना पुढील कार्यवाही ही गैरअर्जदार हे सुट्टीवरुन परत आल्यावर करण्याची विनंती केली होती.

दिनांक १४/०५/२०२५ रोजी कार्यवाही संबंधाने मी सेवक वाघाये यांचे बासमती राईस मिल जवळील हनुमान मंदीरा जवळ सकाळी ०९:३० वाजता हजर आलो. श्री. लोहार सर व त्याचा स्टाफ असे वेळ ०९:५० वाजता हजर आले. मी श्री. लोहार सर यांना गैरअर्जदार यांनी मला लाखनी बसस्थानक येथे हजर येणे बाबत कळविले असल्याचे सांगितले.

श्री. लोहार सरांनी माझी पंच श्री.आवेश खान यांचे हस्ते अंगझडती घेतली व माझे जिन्स चे उजवे बाजुचे समोरील खिशात लिफाप्यातील पावडर लावलेल्या नोटा ठेवल्या. सापळा कार्यवाहीतील सर्व सदस्यांना कार्यवाही संबंधाने सुचना दिल्या. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन त्यात दिनांक २७/०५/२०२५ रोजी कार्यवाही करीता वापरलेले मेमरी कार्ड घातले व पंच श्री. आवेश खान यांचे आवाजात रेकॉर्डीग मोडवर सुरु केले. मी पंच श्री. आवेश खान यांचे सोबत माझे जवळील मोपेड गाडीने बसस्थानक लाखनी येथे गेलो. तिथुन थोडया वेळाने मी गैरअर्जदार यांना फोन केला असता त्यांनी ते रेंगेपार कोठा येथे असल्याचे सांगून थोडया वेळात हजर येत असल्याचे सांगितले. बराच वेळ होवून सुध्दा गैरअर्जदार यांचा फोन आला नसल्याने मी त्यांना परत दोनदा फोन केला परंतु त्यांनी फोन उचलला नाही. त्यांनतर लगेच गैरअर्जदार यांनी फोन करुन मला ते पोलीस स्टेशनला आहेत तुम्ही पोलीस स्टेशनला या असे सांगितल्याने मी पंचासोबत पोलीस स्टेशन लाखनी येथे गेलो. तिथे गैरअर्जदार बसत असलेल्या टेबल कडे गेलो असता त्यांनी मला बोलावून माझे तक्रारी संबंधाने विचारपुस केली. तेव्हा गैरअर्जदार श्री. भजने यांनी तुमची तक्रार आत्राम कडे आहे. तेव्हा मी त्यांना त्यादिवशी एक हजार रुपये कसे घेतले? असे बोललो तेव्हा त्यांनी ते त्यादिवशी पुरते आहे असे सांगून उडवा उडवी केली व रिपोर्ट साहेबाने माझे नावाने लावली असती तर मला अधिकार राहीले असते असे बोलले. थोडयावेळाने ते माझे जवळुन उठुन निघून जात असता मी त्यांना पैसे घेवून घ्या असे बोललो असता ते माझेवर चिडले आणि पोलीस स्टेशनचे बाहेर त्यांचे मोटार सायकलने मानेगाव कडे निघून गेले. मी, पंच आवेश खान याच सोबत पोलीस स्टेशन चे बाहेर थांबून असलेले श्री. लोहार सर यांचे कडे गेलो. त्यांनी माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर पंच आवेश खान यांचे आवाजात बंद केला. मी त्यांना गैरअर्जदार यांना माझे वर संशय आला असावा त्यामुळे ते माझे सोबत आता लाच रक्कमे संबंधाने बोलणी करणार नाही व ते माझे कडुन लाच स्विकारणार नाही, त्यामुळे आपण त्यांचेवर कार्यवाही करावी अशी विनंती केली. त्यावरुन श्री. लोहार सर व त्यांचा स्टाफ मानेगाव कडे गेले व थोडयावेळाने गैरअर्जदार यांना ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला हजर आले. त्यांना त्यांचे

(डॉ. अरुणकुमार लोहार)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 28/08/1977 | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

नाव गाव विचारपुस केला. तसेच माझी, पंच श्री. आवेश खान यांचे कडुन अंगझडती घेतली व पुढील कार्यवाही केली आहे.

गैरअर्जदार राजेश भजने पोलीस हवालदार, पोलीस स्टेशन, लाखनी जिल्हा भंडारा यांनी मला, मी पोलीस स्टेशन, लाखनी येथे दिनांक १८/०४/२०२५ रोजी माझे मुरमाडी येथील घर खाली करुन देणे बाबत दिलेल्या तक्रारीवर कार्यवाही करणे व घराचा ताबा देणे करीता २०,०००/-रुपयाची मागणी करुन प्रथम ५,०००/-रुपये मागितले असल्याने आणि दिनांक २३/०४/२०२५ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान माझे जवळून १,०००/- रुपये स्वीकारुन ४,०००/- रुपये दिनांक २७/०४/२०२५ रोजी स्विकारण्याची तयारी दर्शवीली असुन दिनांक २७/०४/२०२५ आणि आज दिनांक १४/०५/२०२५ रोजी गैरअर्जदार श्री. भजने यांना सापळा कार्यवाही संबंधाने माझेवर संशय आल्याने त्यांनी माझे कडुन लाच रक्कम स्विकारली नाही. करीता गैरअर्जदार श्री. राजेश निलकंठराव भजने, वय ४९ वर्षे, पोलीस हवालदार ब.नं.८९५ नेमणुक पोलीस स्टेशन, लाखनी रा. कुंडलीक गोपाळा कुथे, यांचे घरी किरायाने, समर्थ नगर, मुरमाडी ता. लाखनी, जिल्हा- भंडारा ,मुळ पत्ता:- बेडगाव, तालुका कोरची, जिल्हा-गडचिरोली यांनी मला लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने गैरअर्जदार राजेश निलकंठराव भजने, वय ४९ वर्षे, पद :-पोलीस हवालदार, नेमणुक, पोलीस स्टेशन, लाखनी जिल्हा भंडारा पत्ता :- कुडलीक गोपाळा कुथे समर्थ नगर मुरमाडी,/ लाखनी यांचे घरी किरायाने, मुळ पत्ता:- बेडगाव तालुका कोरची जिल्हा- गडचिरोली यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही होणेस फिर्याद देत आहे.

माझी फिर्याद माझे सांगितले प्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लाखनी येथे लॅपटॉपवर टाईप करण्यात आली. त्याची प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली. वाचुन पाहीले.सांगितले प्रमाणे बरोबर टाईप केली आहे.

14/5/25

(डॉ. अरुणकुमार लोहार)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा

१४-५-२०२५